# <u>प्रेस विज्ञप्ति</u>

## <u>ज्योत उपक्रम – "सेव्ह शिखरजी"</u>
## <u>जैन लोकांचा संघटित उपक्रम सुरूच</u>
### अग्रगण्या द्वारे उपक्रमाची माहिती पहिल्यांदाच प्रेससमोर सादर

दिनांक : १७ ऑक्टोबर २०१८

'सेव्ह शिखरजी' हा सर्वात पवित्र जैन तीर्थ 'शिखरजी'च्या पवित्रतेचे संरक्षण करण्यासाठी जैन लोकांचा संघटित उपक्रम आहे. पवित्र जैन तीर्थ 'शिखरजी' हे 'पारसनाथ हिल' नावाने देखील ओळखले जाते. जैनाचार्य श्रीमद्विजय युगभूषण सुरिजी (पंडित महाराज) यांच्या शुभ मार्गदर्शनांतर्गत विना-नफा संस्था 'ज्योत'ने हा उपक्रम आयोजित केला आहे.

महिन्याभरापूर्वी सुरू झालेल्या या उपक्रमाने केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील संपूर्ण जैन समुदायाला जागृत केले आहे. यूएस, कॅनडा व न्यूझीलंडमधील संस्थांकडून पाठबळ व पत्रांच्या स्वरुपात साह्य मिळत आहे. सरकार अधिकृतरित्या संपूर्ण हिलला 'प्लेस ऑफ वर्शिप' म्हणजेच 'धर्मस्थळ' म्हणून घोषित करत नाही तोपर्यंत हा उपक्रम सुरूच राहील. जगभरातील जैन धर्माच्या चारही संप्रदाय- श्वेतांबर, दिगंबर, तेरापंथी आणि स्थानकवासी- चे प्रमुख साधूसंत एकत्र आले आहेत.

जैन लोकांसाठी सर्वात आदरणीय हिल 'शिखरजी हिल' या ठिकाणी २४ पैकी २० तीर्थंकरांनी अंतिम साधना केली आणि निर्वाण प्राप्त केले. इतर करोडो जैन भिक्षूंनी देखील या निर्वाण मार्गाचे पालन करून मोक्ष प्राप्त केले. हा संपूर्ण पर्वत अतुलनीय दृढता असलेल्या सर्वश्रेष्ठ निर्मल आत्मां द्वारा वासित असून इथला कण-कण पावन आहे. पवित्र आत्मांनी अद्वितीय संकल्प व निर्धार केलेला आहे, म्हणूनच या जागेला पवित्र मानले जाते. अशा प्रकाराची पवित्रता पुन्हा निर्माण करणे आता अशक्य आहे.

या उपक्रमाबाबत विचारले असता आचार्य म्हणाले, "भारताला जगापासून वेगळी प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी बाब म्हणजे भारतात असलेला संपन्न धार्मिक व सांस्कृतिक वारसा आहे. शिखरजींसारखे महातीर्थ हे धार्मिकदृष्ट्या प्रबळ भारताच्या आध्यात्मिक संपत्तीचे प्रतीक आहेत. अशा स्थळांच्या पवित्रतेमध्ये अडथळा निर्माण करणे हे आपल्या देशाच्या अभिमानाला नुकसान पोहोचवण्यासारखेच आहे."

आज या भागामध्ये पर्यटनाला चालना देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमुळे शिखरजीची पवित्रता नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पर्यटनाशी निगडित मद्य, मांस व इतर अनैतिक वर्तन हे तीर्थक्षेत्राची पवित्रता आणि जैन लोकांची श्रद्धा व विश्वासाचे नुकसान करतील. जैन लोक शिखरजी तीर्थयात्रा अनवाणी करतात आणि तीर्थक्षेत्राचे पवित्रता राखण्याच्या हेतूने डोंगरावर अन्न व पाण्याचे सेवन सुद्धा टाळतात. जैनधर्म, धार्मिक प्रॉपर्टीच्या व्यापारीकरण व मनोरंजनात्मक वापरावर बंदी घालते.

भूतकाळांत अशा जैन धर्माविरोधातील कृतींसंदर्भात जैन धर्माचे प्रतिनिधी व्यक्तिश: झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना पुन्हा-पुन्हा भेटले होते आणि आपल्या समस्या त्यांच्यासमोर मांडल्या होत्या. त्यांनी या तीर्थक्षेत्राची पवित्रता राखण्याचे तोंडी वचन दिले असले तरी ते वचन आजदेखील पूर्ण झालेले दिसत नाही. अलबत्त सरकारने इतर धर्माचे मंदिर बांधण्याची देखील घोषणा केली. यामुळे एकूण हिलचे नाव व स्वरूपच बदलून जाण्याची आशंका आहे. सरकारने सुरक्षेच्या कारणास्तव जे हेलिपॅड उभारलेले आहे पण त्या बाबतची अधिकृतरित्या पुष्टी दिलेली नाही. हे सर्व प्रयत्न पर्यटनासाठीच केले जात असण्याची शंका वाढतच आहे.

म्हणूनच 'सेव्ह शिखरजी' उपक्रमाने अखेर जैन समुदायाच्या उत्तेजित भावनांना मार्ग देण्यासाठी आणि त्यांच्या समस्या भारताचे माननीय पंतप्रधान व झारखंडचे मुख्यमंत्री यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मोहीम सुरू केली.

पब्लिक रिलेशन्सचे संचालक श्री. हेमंत एम शाह म्हणाले आहेत, ''जैन लोक अद्वितीयरित्या एकत्र आलेले आहेत आणि त्यांनी फक्त तोंडी वचनांवरच अवलंबून न राहता अंतिम ध्येय गाठेपर्यंत पुढे जाण्याचा संकल्प केलेला आहे. विद्यमान व भावी वाढते धोके पाहता 'सेव्ह शिखरजी' उपक्रम, सर्वांसाठी एक योग्य पर्याय म्हणून संपूर्ण हिलला जैन लोकांसाठी 'प्लेस ऑफ वर्शिप' म्हणून घोषित करण्याचे आवाहन सरकारला करत आहे. जसे मक्का-मदीना मुस्लिमांसाठी आहे, अयोध्या हिंदूंसाठी आहे आणि स्वर्ण मंदिर सिखांसाठी आहे, तसेच शिखरजी जैनांसाठी पूजनीय पवित्र धर्मस्थळ आहे.

भारतात अनेक तलाव, नद्या, लेणी आणि तिरुमला हिल्स, सिक्किममधील नरसिंग शिखर, ओडिशामधील नियमगिरी हिल्स सारखी शिखरे आहेत, ज्यांना अधिकृतरित्या 'प्रार्थनेचे पवित्र स्थळ' म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. जगभरातील काही विकसित देशांमध्ये देखील शिखरांना पवित्र मानले जात आहे, जसे यूएसमधील ग्रॅण्ड कॅनन, ऑस्ट्रेलियामधील उलुरू रेड रॉक. या भागांमध्ये स्थानिक सरकारने कायदेशीर संरक्षण देण्यासोबतच या स्थळांची देखरेख व संवर्धनासाठी धोरणे व नियम देखील तयार केलेली आहेत. ही उदाहरणे पाहता जैन लोकांची मागणी सरकारच्या आवाक्याखाली आहे.

नुकतेच झारखंडच्या मुख्यमंत्रींच्या तोंडी आश्वासनाने संतुष्ट होऊन समाजातील काही लोकांनी उपक्रमाच्या यशाला साजरे केले. मुख्यमंत्र्यांनी तोंडी वचन दिले की शिखराची पवित्रता अबाधित राखली जाईल आणि इतर धर्मांची मंदिरे बांधण्यात येणार नाहीत. पण ही फक्त तोंडी वचने आहेत आणि ''सेव्ह शिखरजी'' उपक्रमाच्या उद्दिष्ट पूर्तीच्या जवळ सुद्धा नाहीत. म्हणून, 'सेव शिखरजी' उपक्रमा द्वारे जैन समुदायाला संदेश देण्यात आला आहे की मोहीम सुरूच आहे आणि अशा तोंडी वचनांमुळे मोहीमेवर परिणाम होता कामा नये. जोपर्यंत अंतिम ध्येये पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलने सुरूच राहतील.

'सेव्ह शिखरजी' उपक्रम स्पष्ट करते की जैन धर्म हा सरकारच्या इतर धर्माची मंदिरे बांधण्याच्या थोर निर्णयाचा आदर करतो. पण इतर धर्माचे 'धर्मस्थळ' नसलेल्या जागी ही मंदिरे बांधता येऊ शकतात. तसेच सरकार ने पर्यटनाला महत्व देण्याचे आपले लक्ष्य बदलून ह्या संपूर्ण क्षेत्राला, जैन तत्वांचा आधारावर आध्यात्मिक ज्ञानाचे आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून प्रांताचा विकास करत 'प्लेस ऑफ वर्शिप' म्हणजेच 'धर्मस्थळ' घोषित केले पाहिजे.

या उपक्रमाला भव्य प्रतिसाद मिळाला आहे. महिन्याभरांत भारत भरांतून सुमारे ४ लाखांपेक्षा जास्त लेखी याचिका, आणि मुंबई, पुणे, विजापूर व बेंगळुरूमधील विविध सार्वजनिक रॅलीज, महिला आंदोलनाचे पाठबळ मिळण्यासोबतच अनेक लोकांनी विशाल संख्येने या उपक्रमामध्ये सहभाग घेतलेला आहे. जैन लोकांची धार्मिक शिखराप्रती भावनिक ओढ आणि व्यापक जागरुकता पाहता आम्ही आशा करतो की सरकार ह्या भावनिक निविदा व थोर कारणाला सकारात्मकपणे पाठिंबा देतील आणि आमची मागणी स्वीकारण्यात येईल.

**संपर्क:**
**सेव्ह शिखरजी आणि ज्योत**
**हेमंत एम. शहा**
**संचालक – प्रशासन संपर्क आणि जनसंपर्क**
**मोबाईल: ९८२००५३५३० /. ९३२७०३८०९१**
**ईमेल – hemantshah@shaw.ca / info@saveshikharji.com**
**संकेतस्थळ - www.SaveShikharji.com**